# Appendix E

## A Lesson Observation Scale Used in Observing the Lessons.

<u>पाठ निरीक्षण मापिका</u>

| पाठपूर्व नियोजन | काहीच नाही     अतिशय उत्तम |
|---|---|
| 1) पाठाची उद्दिष्टे योग्य होती. त्यांची स्पष्टीकरणे स्पष्ट सांगीतली होती. ती विषयवस्तूशी निगडीत होती. पुरेशी होती व साध्य करण्याजोगी होती. | 0 1 2 3 4 5 6 7 |
| 2) निवडलेला पाठ्यघटक व विषयवस्तू योग्य होती. पाठाच्या उद्दिष्टांशी निगडीत होती व पुरेशी होती. | 0 1 2 3 4 5 6 7 |
| 3) निवडलेल्या विषयवस्तूचे संघटन योग्य होते. तर्कसंगत होते. | 0 1 2 3 4 5 6 7 |
| 4) निवडलेली दृकश्राव्य साधने योग्य होती. विद्यार्थी व विषयवस्तू यांना निगडीत होती. पुरेशी होती. उद्दिष्टे साधण्यास गरजेची होती. | 0 1 2 3 4 5 6 7 |
| <u>विषय विवेचन</u> | |
| 5) पाठाची प्रस्तावना परिणामकारक होती. विद्यार्थ्यांना भावनिकदृष्ट्या व नवीन ज्ञानप्राप्तीच्या दृष्टीने दक्ष करणारी होती. पूर्वज्ञान जागृत करणारी होती. प्रश्नांमध्ये सुसंगती होती. पूर्वज्ञानाचा नव्या ज्ञानाशी संबंध प्रस्थापित करणारी होती. जिज्ञासा जागृत करणारी होती. | 0 1 2 3 4 5 6 7 |
| 6) विचारलेले प्रश्न योग्य होते. त्यांची रचना चांगली होती. प्रश्नांमुळे विद्यार्थ्यांचा पाठात सहभाग वाढविला होता. | 0 1 2 3 4 5 6 7 |

| | |
|---|---|
| 7) शोधक प्रश्न विचारून, सूचकांचा उपयोग करून अधिक माहिती द्यावयास लावून विद्यार्थ्यांची चिकित्सक वृत्ती वाढविली. | 0 1 2 3 4 5 6 7 |
| 8) तत्वे आणि संबोधाचे स्पष्ट व परस्परांसंबंधित विधानांनी स्पष्टीकरण करून विद्यार्थ्यांच्या आकलनात बदल केला. | 0 1 2 3 4 5 6 7 |
| 9) योग्य उदाहरणांनी व योग्य दृकश्राव्य माध्यमांनी तत्वे आणि संबोध स्पष्ट केले. उदाहरणे सोपी होती. साधने विषयवस्तूशी निगडीत होती व ती अभिरुची निर्माण करणारी होती. | 0 1 2 3 4 5 6 7 |
| 10) विद्यार्थ्यांचे अवधान वेधून घेतले. त्यासाठी विविध चेतकांचा उपयोग केला. हालचाल हावभाव शब्दांचे चढउतार आवाजात चढउतार इ.चा उपयोग केला. | 0 1 2 3 4 5 6 7 |
| 11) शांतता व अशाब्दिक संकेताचा विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविण्यात उपयोग करून घेतला. | 0 1 2 3 4 5 6 7 |
| 12) विद्यार्थ्यांच्या पाठातील सहभाग शाब्दिक व अशाब्दिक प्रबलनाचा उपयोग करून वाढविला. | 0 1 2 3 4 5 6 7 |
| 13) वेळेचे नियोजन व अंदाजपत्रक योग्य होते. | 0 1 2 3 4 5 6 7 |
| 14) विद्यार्थ्यांचा वर्गातील सहभाग चांगला होता. त्यांनी शिक्षकास पुरेसा प्रतिसाद दिला. स्वतःच्या काही कल्पना सांगून प्रतिसाद दिला. | 0 1 2 3 4 5 6 7 |
| 15) फलकलेखन व फलककार्य चांगले होते. वाचन योग्य पुरेसे होते. | 0 1 2 3 4 5 6 7 |

<u>स मा रो प</u>

| | |
|---|---|
| 16) पाठाचा समारोप योग्यरितीने केला. पाठातील महत्वाचे मुद्दे एकत्र केले. त्यांची पूर्वज्ञानाशी सांगड घातली. स्वाध्यायाशी सांगड घातली. | 0 1 2 3 4 5 6 7 |

17) विद्यार्थ्यांना दिलेला स्वाध्याय योग्य होता. विद्यार्थ्यांतील व्यक्तीभेदाशी निगडीत होता. शिकवलेल्या भागाशी निगडीत होता. 0 1 2 3 4 5 6 7

<u>मूल्यमापन</u>

18) विद्यार्थ्यांनी पाठाच्या ठरविलेल्या उद्दिष्टानुरूप झालेली प्रगती तपासली. मूल्यमापन पध्दती योग्य होती. सप्रमाण, विश्वसनीय तसेच वस्तुनिष्ठ होती. 0 1 2 3 4 5 6 7

एकूण प्राप्तांक निरिक्षकाची सही

पाठाचा दर्जा अ / ब / क निरिक्षकाचे नाव ------------------